माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२१३०**

**अपिलार्थी श्री. रामशंकर सरोज**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
कुर्ला विभाग, कुर्ला पोलीस स्टेशन, कुर्ला (प), मुंबई-४०० ०७०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-५)**
सागरी पोलीस ठाणे, २ रा माळा, माहिम रेती बंदर,
माहिम डेपोसमोर, मुंबई - ४०००१६

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलदिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०३.२०२३ | ०३.०४.२०२३/०५.०८.२०२३ | ०६.०५.२०२३ | २२.०६.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.०८.२०२३ रोजीच्या अर्जांन्वये चुकीची व अपूर्ण माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०३.०४.२०२३, ०५.०८.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.०६.२०२३ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २९.०३.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- "धारावी पोलीस ठाणे मधील दि. १६.०१.२०२३ रोजी सकाळी ७.०० ते सायंकाळी ८.०० वाजेपर्यंतचे एकुण सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याचे फुटेज मिळण्याबाबत.

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०४.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी special leave petition (criminal) no ३५४३ of २०२० मधील आदेशानुसार पोलीस ठाणेतील सी.सी.टी.व्ही. फुटेज जतन करण्यात येत असुन आपण मागणी केलेले पोलीस ठाणेचे सी.सी.टी.व्ही. फुटेज नाकारण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१८.०७.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०६.२०२३ रोजी आदेशित केले की, अपिलकर्ते यांना माहिती बघण्याचा अधिकार असून तरी त्यांना पाहिजे असलेली माहिती बघण्यास उपलब्ध करावी.

..२/-

४. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०८.२०२२ रोजी अपिलार्थींना कळविले की, अर्जदार यांचे प्रथम अपील सुनावणीत पारित आदेशान्वये सुधारित माहिती अशी की, अर्जदार यांना आवश्यक असलेल्या माहितीचा दिनांक व वेळेचा CCTV फुटेज पेनड्राईव्ह मध्ये संकलीत केला असुन सदरचा पेनड्राईव्ह सोबत जोडला आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर दि. १६.०१.२०२३ रोजीचे सी.सी.टी.व्ही. फुटेज बघण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले व त्यांनी सदर सी.सी.टी.व्ही.फुटेज पाहून काही ठरावित वेळेची सी.सी.टी.व्ही. फुटेजची मागणी केली होती. परंतु त्यांना पेनड्राईव्हमध्ये जे सी.सी.टी.व्ही. फुटेज उपलब्ध करुन दिले ते त्यांच्या मागणीप्रमाणे नाही. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास सादर केले की, दि. १६.०१.२०२३ रोजीचे सी.सी.टी.व्ही. फुटेज संबंधीत पोलीस ठाणे येथे जतन करुन ठेवण्यात आलेले आहे.

६. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी केलेल्या विनंती नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दि.११.११.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या कार्यालयात बोलवून दि. १६.०१.२०२३ रोजीचे सी.सी.टी.व्ही. फुटेज बघण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे व सी.सी.टी.व्ही. फुटेज बघितल्यानंतर हवे असलेले फुटेज पेनड्राईव्हमध्ये निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

6-11-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**